क्र.का.३/संगणक/ ५८६/२०१४.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.
दिनांक - १/०४/२०१४.

**परीपत्रक :-**

**विषय :- इनपुट फॉर्मबाबत.**

राज्यात सन २००२ मध्ये दस्त नोंदणीसाठी संगणकीय प्रणालीचा (सरिता) वापर सुरू झाल्या नंतर दस्तासंबधीची माहिती प्रणालीमध्ये भरण्यासाठी इनपुट फॉर्म पध्दत सुरू करण्यात आली.

आय सरिता प्रणालीची अंमलबजावणी सूरू झाल्यानंतरही याचप्रकारे अंमलबजावणी होत आहे तथापी काही कालावधीनंतर नागरीकांना पब्लीक डाटा एन्ट्री हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला त्यामध्ये नागरीक स्वताच्या दस्ताची डाटा एन्ट्री करून ११ अंकी नंबर / किंवा डाटा एन्ट्रीची प्रिंट घेवून येतात दुय्यम निबंधक कार्यालयात त्याक्रमांकाचे अधारे डाटा फेच केला जातो व नोंदणीपूर्व गोषवारा प्रिंट केला जातो. याप्रक्रियेत हाताने लिहलेल्या इनपुट फॉर्मचे कोणतेही स्थान नाही. त्यामुळे दुय्यम निबंधक यांनी त्याची मागणी करणे अभिप्रेत नव्हते तथापी लेखी सूचना न दिल्याचे कारण पुढे करून काही दुय्यम निबंधक कार्यालयात हस्तलिखीत इनपुट फॉर्मची मागणी केली जाते.

यामुळे नागरीकांना पब्लीक डाटा एन्ट्री करूनही हस्तलिखीत इनपुट फार्म भरावा लागतो यामध्ये श्रम व कागद वाया जातात. या संदर्भात स्पष्ट सूचना देण्यात याव्यात अशी मागणी या कार्यालयाकडे करण्यात आलेली आहे.

सबब सर्व दुय्यम निबंधक यांना सुचित करण्यात येत की, ज्या दस्तांचे बाबतीत पब्लीक डाटा एन्ट्री मधून डाटा एन्ट्री करण्यात आली आहे त्या दस्तांचे सोबत इनपुट फॉर्मची आवश्यकता नाही. पक्षकारांना जर डाटा एन्ट्री मधून नोंदणी पूर्व गोषवारा प्रिंट करून आणला असेल तर त्याआधारे दस्तातील माहितीशी पडताळणी करावी, आवश्यक त्या दुरूस्त्या डाटा एन्ट्री मध्ये कराव्यात त्यानंतर पुन्हा कार्यालयात नोंदणी पूर्व गोषवारा मुद्रीत करून पडताळणी करावी व त्यावर पक्षकारांच्या सहया घ्याव्यात व लिपिक / दुय्यम निबंधक यानी सहया कराव्यात व ती प्रिंट टोकन / दस्तनंबर नमुद करून कार्यालयीन अभिलेखात क अभिलेख म्हणून ठेवण्यात यावी मात्र पब्लीक डाटा एन्ट्री नसेल तर पूर्वीप्रमाणेच इनपुट फार्म व अनुषंगीक सुचना लागू राहतील.

**का.प्र. मा नो. म. नी यांचे स्वाक्षरीची असे**

१/४/२०१४

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य पुणे करिता

प्रती :- सर्व दुय्यम निबंधक (संबधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचे मार्फत)

प्रत :- १. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
२. सर्व सह जिल्हा निबंधक
३. सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय पुणे.